महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२१/प्र.क्र.०३/२०२३/जाहिरात दिनांक: ३१ मे, २०२३

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : संचालक-आयुष, गट-अ, आयुष संचालनालय**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक-०२२/२०२३**

शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील आयुष संचालनालयातील संचालक-आयुष, गट-अ या संवर्गातील एका पदाच्या भरतीकरीता आयोगामार्फत दिनांक १० मे, २०२३ रोजी जाहिरात (जाहिरात क्रमांक ०२२/२०२३) प्रसिध्द करण्यात आली आहे. जाहिरातीमध्ये सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार शैक्षणिक अर्हता व अनुभव नमूद करण्यात आला आहे. शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या क्रमांक आयुसे-०८२१/प्र.क्र.९८/आयु-१, दिनांक ३० मे, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास प्राप्त अभिप्रायानुसार जाहिरातीमधील अ.क्र. ८.२(२) येथे तसेच अ.क्र. ८.५ येथे खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

**परिच्छेद क्रमांक ८.२(२):-** प्रस्तुत संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार उपरोक्त परिच्छेद क्रमांक ८.२(१) मध्ये अनुभव नमूद करण्यात आला आहे. तथापि, शासन पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक आयुसे-०८२१/प्र.क्र.९८/आयु-१, दिनांक ३१ मार्च, २०२३ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार, संचालक, आयुष पदासाठी अधिष्ठाता **आणि** प्राध्यापक या संवर्गातील एकत्रित सात वर्षांचा अनुभव ग्राह्य समजण्यात येईल.

**परिच्छेद क्रमांक ८.५:-** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विविध स्वरुपाचे दावे करताना अथवा दावे अद्ययावत करताना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अनुभवाच्या दाव्यांनुसार पात्र होण्यासाठी उमेदवाराने Nature of Job - Dean and Professor OR Administrative experience in Ayuarved Department असे नमूद करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय, ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज स्वीकृत होऊ शकणार नाही.

२. शासनाने सुधारणा केल्यामुळे, अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक ०२२/२०२३ ला अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक | दिनांक १२ जून, २०२३ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक | दिनांक १२ जून, २०२३ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक | दिनांक १४ जून, २०२३ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १५ जून, २०२३ रोजी २३.५९ |

३. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

४. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०२२/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.